| कर्मचाऱ्यांचा वर्ग | | सुधारीत दर | | |
|---|---|---|---|---|
| | | झोन-१ | झोन-२ | झोन-३ |
| कुशल, निमकुशल आणि अकुशल प्रौढ कामगारां व्यतिरिक्त इतर प्रौढ कामगारांसाठी ठरवून दिलेले दर. | मासिक दर | रु. १०५० | रु. ९५०/- | रु. ९२०/- |
| | रोजंदारीचे दर | रु. ४०.४० | रु. ३६.५० | रु. ३५.४० |

३. सदर ठरवून दिलेले दर अदा करण्यासाठी शासनाने मुख्य विभाग [झोन] पाडलेले आहेत, त्यानुसार झोनमध्ये खालील शहरांचा, गावांचा समावेश होतो व त्याकरिता सदरचे सुधारीत दर लागू करावयाचे आहेत.

[अ] झोन-१. १] बृहन्मुंबई, २] रायगड जिल्ह्यातील उरण, पनवेल, कर्जत आणि खालापूर तालुके, ३]ठाणे जिल्ह्यातील ठाणे, वसई, भिवंडी, कल्याण आणि उल्हासनगर तालुके.

[ब] झोन-२. १] पुणे शहर व पुणे जिल्ह्यातील हवेली मुळशी, दौंड आणि खेड तालुके, २] नागपूर जिल्ह्यातील नागपूर तालुका,
३] कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर तालुका,
४] सोलापूर जिल्ह्यातील सोलापूर उत्तर तालुका.
५] नाशिक जिल्ह्यातील नाशिक तालुका.

[क] झोन-३. यामध्ये महाराष्ट्र राज्यातील झोन-१ व झोन-२ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणांचा समावेश असेल.

उपरोक्त सुधारीत मासिक दरामध्ये व रोजंदारीच्या दरामध्ये आठवडा सुट्टीच्या विश्रांतीच्या दिवसाचे देय रक्कमेचा समावेश करुन दर निश्चीत केलेले आहेत. सदरचे सुधारीत दर दिनांक २० जून, १९९९ पासून पुढे अंमलात येतील.

४. कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. १४/१९९२ दिनांक ३०.७.१९९२ नुसार सक्त सूचना देण्यात आल्या होत्या की, कोणत्याही परिस्थितीमध्ये नैमित्तिक कामगार कोणत्याही आगार / कारखान्यांनी नेमण्यात येऊ नयेत. त्याप्रमाणे सर्व विभागांनी याची अंमलबजावणी केलेली आहे असे गृहीत धरण्यात येत आहे.

वरील सूचनांनुसार क्र. २ मधील सुधारीत दर विचारात घ्यावेत व त्याप्रमाणे कार्यवाही करावी. सदरच्या सूचना लेखा खात्याचे सहमतीने व विधी सल्लागार यांचे सल्ल्याने प्रसारित करण्यात येत आहेत. काही अडचणी / शंका आल्यास या कार्यालयाशी जरुर संदर्भ करावा.

उप महा व्यवस्थापक [क.व औ.सं.]

प्रत सादर रवाना :-

---------------------------------- यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

उप महा व्यवस्थापक [क.व औ.सं.]करिता.

पि/ए